# चार टक्क्याच कर्ज

श्री. गणेश पंडित
कृषी तज्ञ (बँकिंग)

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असणाऱ्या शेती आणि शेतीपूरक व्यवसायाला सतत आधार देणारं, गेली कित्येक वर्ष शेतकऱ्याच्या हिताच, मदतीच काम करणार एक क्षेत्र म्हणजे बँक किंवा बँकिंग.

शेतकऱ्यांच्या आणि इतर सामान्य माणसाच्या मनात बँकेविषयी बरेच समज गैरसमज आहेत. हे सगळे गैर असलेले किंबहुना वाटलेले समज जेव्हा दूर होतील तेव्हा बँक हे प्रत्येकासाठी किती महत्त्वाच व्यासपीठ आहे हे आपल्या लक्षात येईल. बँक हे आपल्या आर्थिक नियोजनापासून ते कर्ज वापरापर्यंत मोलाच सहकार्य करत. बँक हे समाज हिताच आणि हक्काच साधन आहे, फक्त आपण त्याचा वापर कसा करायचा यावर आपल यश, अपयश आणि समाधान अवलंबून आहे.

शेतकरी वर्ग हा बँकेपासून खूपच विरहित आहे. त्यामागे कदाचीत साक्षरतेचा अभाव असेल, भीती असेल, काही प्रश्न असतील, न्युनगंड असेल, हे सर्व दुर करायला हवेत. या गोष्टी तेव्हाच शक्य आहेत तेव्हा शेतकरी स्वतः निर्धास्तपणे बँकेची पायरी चढेल. फक्त सुरुवात तुमच्यापासून करा. तुम्हाला हवी असेल नसेल ती मदत, ती योजना बँककडे उपलब्ध आहे. तुमचे प्रश्न विचारा, अडचण सांगा, तुमची योजना सांगा. बँकेला सावकार समजण्याची चूक अजिबात करू नका, जेवढी तुम्हाला बँकेची गरज आहे तेवढीच बँकेला पण तुमची आवश्यकता आहे.

पिक कर्ज हे शेतीसाठी सर्वात महत्त्वाच आहे, जर भांडवलच नसेल तर कशी होईल शेती, हे भांडवल शेतकरी एकदम सोप्या पद्धतीने मिळवू शकतो. जशी शेतकऱ्याला कर्जाची गरज आहे तशी बँकेलाही त्यांच्या एकूण Adjusted Net Bank Credit (ANBC) च्या १८ % रक्कम हि शेती आणि शेतीपुरक व्यवसायासाठी कर्जाच्या स्वरुपात देण बंधनकारक आहे.

### पिक कर्जाविषयी आपण थोडस समजून घेऊ:

कोणत्याही पिकाला लागणारा खर्च यावरून त्या पिकाच्या कर्जाची रक्कम ठरवली जाते, त्यात बी बियाण, मशागत, खते इत्यादीला लागणारा खर्च विचारात घेतला जातो. हा खर्च प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी DISTRICT LEVEL TECHNICAL COMMITTEE (DLTC) ठरविते, आणि त्यानुसार ते बँकांना कर्ज देण्यासाठी परवानगी देतात. यामध्ये प्रत्येक पिकासाठी वेगवेगळी कर्जाची रक्कम निर्धारित केली जाते. त्यानुसारच बँका कर्ज वितरीत करत असतात. उदा. ऊस निर्धारित केलेली रक्कम: ५००००.०० त्यात पिक काढणीनंतरच्या कामांकरिता (Post Harvest Expenses) आणि इतर घरगुती वापरासाठी मिळून (निर्धारित केलेल्या रकमेच्या ३० % रक्कम वाढीव देतात. नंतरची ३० % रक्कम: १५०००.०० म्हणजेच पूर्ण मिळणारी रक्कम हि ६५०००.०० रु. होते.

पिक कर्जाची परतफेड हि १ वर्षापर्यंत उत्पन्न देणाऱ्या पिकासाठी (Short term crop) जास्तीत जास्त १२ महिने तर उत्पन्न देण्यासाठी १ वर्षापेक्षा जास्त (Long Term Crop) वेळ घेणाऱ्या पिकांसाठी १८ महिने असते. हि रक्कम जर वेळेत परत केली तर कर्जदारास मुबलक फायदे मिळतात. तर त्यात केंद्र सरकार २ % आणि रिजर्व बँक ३ % व्याज सवलत देते पण त्यासाठी कर्जाची परतफेड हि वेळेत व्हायला हवी आणि हे सर्व जर वेळेत झाले तर ३ लाख रुपयापर्यंतचे पिक कर्ज फक्त ४ % व्याजावर मिळते.

★ ★ ★

### जून महिन्यात फळबाग व्यवस्थापनात करावयाची कामे

डाळिंब: पावसाचे अतिरिक्त पाणी काढुन द्यावे. पिक संरक्षणार्थ फळे पोखरणारी अळी, रस शोषणाऱ्या किडी व पानावरील ठिपके नियंत्रण करावे.

सिताफळ: मशागतीची कामे करावीत.

बोर: शिफारशीत खताच्या मात्रा द्याव्यात. नवीन फुटीवर पाने खाणारी अळी/ भुंगेरेचे नियंत्रण करावे.

आवळा: संरक्षित पाणी द्यावे. पाने खाणारी अळी, फुलकिडे यांचे नियंत्रण करावे.

जांभूळ: बागेची स्वच्छता, फळांची काढणी.

कागदी लिंबू: शिफारशीत खतमात्रा (६००:३००:६०० ग्रॅम नत्र:स्फुरद:पालाश प्रति झाड प्रति वर्ष) + १५ किलो शेणखत + १५ किलो निंबोळी पेंड द्यावी. त्यापैकी ४० % नत्र व संपूर्ण स्फुरद, पालाश, शेणखत व निंबोळी पेंड द्यावी. हस्त बहाराच्या नियोजनासाठी जिब्रेलिक ॲसिड ५० पी.पी.एम. ची फवारणी करावी. पिठ्या ढेकूण: क्लोरोपायरीफॉस २० टक्के २० मिली / १० लि. पाणी अथवा बुप्रोफोडीन १२.५ मिली / १० लि. पाणी. कोळी: डायकोफॉल २०-२५ मिली / १० लि. पाणी. खैऱ्या रोगाच्या नियंत्रणासाठी लिंबू बागेमध्ये झाडावरील वाळलेल्या फांद्या काढून कापलेल्या जागेवर बोर्डोपेस्ट लावावी.